# सोलर डिलर मिटींग

## प्रसंग- सोलर डिलर मिटींग

*दि. २८-१०-२०१२, स्थळ - गांधी तीर्थ, जैन हिल्स, जळगाव*

लोकांनी चालवलेलं लोकांसाठी आणि लोकांचे राज्य ही लोकशाहीची व्याख्या. आम्हाला जेव्हा हा प्रश्न पडला की काल आपण या पक्षात होतो आज आपण या पक्षात आलो हे कसं काय होतं, याला काही अर्थ आहे की नाही, तर आम्ही त्याचा खूप शोध घेतला. मी स्वतः पुस्तकं चाळली की लोकशाही किती तज्ज्ञ आहे. याचा मुळ पाया काय तर त्याचा मुळ पाया लोकशाही म्हणजे लोकांची शाही, लोकांचे राज्य, लोकांच्या जे मनात आहे ते आपण केलं पाहिजे. मग लोकांच्या मनात काय आहे याचा शोध घेण्यासाठी आपल्याला लोकांच्या समोर जायला पाहिजे आणि प्रत्येकवेळा लोकांच्या समोर जाऊन शोध घेतला तर आपल्याला गवसतं की लोकांना काय हवयं. लोकांना जे हवं आहे ते ज्या वेळेला घडत नाही त्यावेळेला मग खांदेपालटच होत नाही तर पक्ष पालटसुद्धा होत असते. आणि ही प्रक्रिया आपल्यादेखत सुरु झाली.



F:\Bhashan\Bhashane 4 book\bhashane Book7_91-108